# परिपत्रक

विषय :- इमारतीच्या उदवाहनांमध्ये अतिरिक्त भार यंत्रणा (Overload device) / स्वयंचलित आपतकालीन सहाय्य यंत्रणा (Automatic rescue device) यासारख्या यंत्रणेचा वापर बंधनकारक करणेसाठी.

वरील संदर्भांकित विषयानुसार या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील (मुंबई व पुणे) सर्व उदवाहन कंपनी तसेच उदवाहन ठेकेदार यांना सूचित करण्यात येते की, उदवाहन सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून निम्नस्वाक्षरीकारांच्या मा.मुख्य अभियंता यांच्यासोबत तसेच उदवाहन कंपनी व उदवाहन ठेकेदार प्रतिनिधी यांच्यासोबत कार्यालयीन स्तरावर आणि मंत्रालयीन स्तरावर सचिवांसोबत झालेल्या बैठकींच्या अनुषंगांने तसेच महम्मद अफझल विरुदध महाराष्ट्र शासन या न्यायप्रविष्ठ प्रकरणादरम्यान मा. उच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार उदवाहन हाताळणीसंबंधी अज्ञानं तसेच निष्काळजीपणामुळे होणा-या अपघाताचें प्रमाण लक्षात यापुढे या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व इमारतीमधील उदवाहनांमध्ये अतिरिक्त भार यंत्रणा (Overload device) आणि स्वयंचलित आपतकालीन सहाय्य यंत्रणा (Automatic rescue device) यासारख्या यंत्रणेचा वापर बंधनकारक करण्यात येत आहे.

सदर तरतूदीची अंमलबजावणी या परिपत्रकाच्या निर्गमति दिनांकापासून दोन महिन्यांनी म्हणजेच माहे जानें-२०१३ पासून काटेकोरपणे लागू असेल.तसेच त्यानंतरच्या कालावधीत उदवाहन उभारणी व देखभालीचा परवाना मिळणेबाबत या कार्यालयास प्राप्त होणा-या प्रस्तावात उपरोक्त नमूद आपात्कालीन सुविधांची पूर्तता केल्याखेरीज कोणत्याही प्रस्तावाचा पुढील कार्यवाहीसाठी विचार करता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

जा.क्र. वि.निउ.मुं./महसूल/५३७४/ सन २०१२
विद्युत निरिक्षक, (उद्वाहन मुंबई ) यांचे कार्यालय
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, प्रशासकीय विभाग
पहिला मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
सार्वजनिक बांधकाम विभाग आवार,
रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पुर्व)
मुंबई ४०० ०७१
दि. ०३/११/२०१२

(सं. मु. भस्मे )
विद्युत निरिक्षक(उद्वाहन मुंबई)
उ.ऊ.व कामगार विभाग
चेंबूर, मुंबई.

प्रत :- मा. मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, बांधकाम भवन, मर्झबान रोड,मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- अधीक्षक अभियंता, मुंबई प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडल, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत :- सहाय्यक विद्युत निरीक्षक (उद्वाहन) कक्ष क्र. १/२/३/४/५/६ मुंबई, व ७/८/९/१० पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

प्रत :- विभागीय आस्थापना शाखा /परवाना शाखा/अनुज्ञाप्ती शाखा/महसूल शाखा/आवक जावक विभाग यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- परिपत्रक नस्तीस व कार्यालयीन वार्षिक तपासणी नस्तीस